शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राज्यात व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था सुरु करण्यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. टीईएम-२०१८/प्र.क्र.१९५/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०४ जून, २०१८.

<u>संदर्भ</u> : संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र
क्रमांक २/एनजीसी/मान्यता/२०१८/५७७, दिनांक १०.०५.२०१८ व सहपत्रे

<u>प्रस्तावना</u> :-

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राज्यात व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या नवीन संस्थांना मान्यता देण्यासंदर्भात दिनांक ०७.०५.२०१८ रोजीच्या ई-मेल द्वारे तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना प्राप्त झालेल्या यादीच्या अनुषंगाने संचालक,तंत्र शिक्षण यांनी संदर्भीय पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०१८-१९ मधील तरतुदीनुसार औषधनिर्माणशास्त्र पदवी संस्थेत औषधनिर्माणशास्त्र पदविका आणि औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्थेत औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याची तरतूद आहे. त्यानुसार सोबतच्या Annexure A मधील अ.क्र. १, २, ४, ६, ७, १०, ११, १३ व १४ समोरील संस्थांनी औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासोबत पदविका अभ्यासक्रम सुध्दा सुरू करण्यासाठी केलेल्या अर्जास अनुसरुन अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांना मान्यता दिलेली असून त्यांचा Application ID सुध्दा एकच आहे, त्यामुळे या संस्थांचा मान्यतेचा शासन निर्णय एकच असणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर ९ नवीन संस्थेतील पदविका अभ्यासक्रमांचा सोबतच्या Annexure A मध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे. सोबत जोडलेल्या Annexture A मधील <u>अ.क्र. १ ते १९</u> समोरील नमूद संस्थां[illegible] दर्शविल्याप्रमाणे [illegible] औषधनिर्माणशास्त्र पदविका व पदवी, व्य[illegible] पदव्युत्तर [illegible]का (पीजीडीएम) [illegible]च्या

संस्था सुरु करण्यास शासन मान्यता देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन सोबत जोडलेल्या Annexture A मध्ये नमूद अ.क्र. १ ते १९ संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अनुक्रमे नवीन पदविका, पदवी अभ्यासक्रम व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेशक्षमता Annexture A मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.

३. शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

४. सदर अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक राहील.

५. सदर औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता घेणे आवश्यक राहील.

६. फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची दिनांक १०/१२/२०१४ ची अधिसूचना विचारात घेता, नव्याने मान्यता देण्यात आलेल्या पदविका व पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांनी फार्मसी ॲक्ट, १९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेतल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देवू नयेत. याकरीता "The Bachelor of Pharmacy (B.Pharm) Course Regulation 2014" मधील Chapter-I मधील क्र.९ मधील तरतुद पुढीलप्रमाणे असून

त्याचे पालन करणे आवयक राहील.

"No.Person, Institution, Society, Trust or university shall start and conduct B. Pharm Programme without the prior approval of the Pharmacy council of India."

सदर मान्यतेअभावी भविष्यात काही न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्यास याप्रकरणी संबंधित संस्था पूर्णपणे जबाबदार राहतील. तसे हमीपत्र संबंधित संस्थाप्रमुखांनी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे सादर करावयाचे आहे. त्यानंतरच सदर संस्थांना अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी संचालनालयाने संमती द्यावयाची आहे.

७. संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

८. सदर पदविका, पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

९. शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

१०. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

११. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

Sr. No.	CURRENT APPLICATION ID	Institute Code	Name of the Trust	Name of the Institute	INSTITUTE ADDRESS	INSTITUTE DISTRICT	INSTITUTE TYPE	MINORITY INSTITUTE	PROGRAMME	AFFILIATING UNIVERSITY / DEPARTMENT	LEVEL OF COURSE	Name of Course	SHIFT	FULL TIME / PART TIME	APPROVED INTAKE 2017-18	APPROVED INTAKE 2018-19
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13	14	15	16	17
9	1-3675171381	New Institute	EDUCATION SOCIETY NAIGAON,AT POST NAIGAON(BZ) TQ NAIGAON(KH) DIST NANDED 431709	BALAWANTRAO CHAVAN COLLEGE OF PHARMACY	AT POST NAIGAON (BZ) LALWANDI ROAD TQ NAIGAON (KH) DIST. NANDED	NANDED	Unaided - Private	N	PHARMACY	Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded	UNDER GRADUATE	PHARMACY	1st Shift	FULL TIME	0	60
10	1-3703509731	New Institute	SHREE GORAKSHA SHAIKSHANIK BAHUUDDESHIY SANSTHA KHAMGAON, AT POST KHAMGAON TQ PHULAMBRI DIST AURANGABAD 431151	SHREE GORAKSHA COLLEGE OF PHARMACY AND RESEARCH CENTER	GUT NO. 402 KHAMGAON TQ PHULAMBRI DIST AURANGABAD 431151	AURANGABAD	Unaided - Private	N	PHARMACY	Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad	UNDER GRADUATE	PHARMACY	1st Shift	FULL TIME	0	100
									PHARMACY	Maharashtra State Board of Technical Education, Mumbai	DIPLOMA	PHARMACY	1st Shift	FULL TIME	0	60
11	1-3723579141	New Institute	SHRIRAM DNYAN SHIKSHAN PRASARAK MANDAL,VAIJPAUR, A/P-AAGHUR TAL- VAIJAPUR DIST- AURANGABAD	NANDKUMAR SHINDE COLLEGE OF PHARMACY VAIJAPUR	GAT NO. 222,AGHUR,TAL. VAIJAPUR DIST.AURANGABAD.	AURANGABAD	Unaided - Private	N	PHARMACY	Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere	UNDER GRADUATE	PHARMACY	1st Shift	FULL TIME	0	100
									PHARMACY	Maharashtra State Board of Technical Education, Mumbai	DIPLOMA	PHARMACY	1st Shift	FULL TIME	0	60
12	1-3667154521	New Institute	MITRA SADHANA SHIKSHAN PRASARAK MANDAL, AT.POST.PATHRI,TQ.PHULAMBRI,DIST.AURANGABAD	LATE BHAGIRATHI YASHWANTRAO PATHRIKAR COLLEGE OF PHARMACY	AT.PATHRI,,TQ.PHULAMBRI,DIST.AURANGBAD,MS	AURANGABAD	Unaided - Private	N	PHARMACY	Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere	UNDER GRADUATE	PHARMACY	1st Shift	FULL TIME	0	100
13	1-3712457491	New Institute	SHIVA TRUSTS,3RD FLOOR, SONIA CHAMBERS,NEAR SEVEN HILL, OVER BRIDGE,JALNA ROAD,AURANGABAD	GAJANAN MAHARAJ COLLEGE OF PHARMACY	GUT NO 179 NEAR VIDEOCON COMMUNICATION LTD, BEED HIGHROAD, AT NIPANI, AURANGABAD	AURANGABAD	Unaided - Private	N	PHARMACY	Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere	UNDER GRADUATE	PHARMACY	1st Shift	FULL TIME	0	100
									PHARMACY	Maharashtra State Board of Technical Education, Mumbai	DIPLOMA	PHARMACY	1st Shift	FULL TIME	0	60
14	1-3709703721	New Institute	SWAMI VIVEKANANAD SHIKSHAN PRASARAK MANDAL, SURVEY NO. 184, BODHAN NAGAR, JALKOT ROAD, UDGIR	SWAMI VIVEKANAND COLLEGE OF PHARMACY UDGIR	SURVEY NO. 184, BODHAN NAGAR, JALKOT ROAD	LATUR	Unaided - Private	N	PHARMACY	Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded	UNDER GRADUATE	PHARMACY	1st Shift	FULL TIME	0	60
									PHARMACY	Maharashtra State Board of Technical Education, Mumbai	DIPLOMA	PHARMACY	1st Shift	FULL TIME	0	60
15	1-3726528651	New Institute	ANGARSIDDHA SHIKSHAN PRASARAK MANDAL, POST ANGAR, TQ. MOHOL, DIST. SOLAPUR	ASPM COLLEGE OF PHARMACY	SANGULWADI, TQ. VAIBHAVWADI, DIST. SINDHUDURG	SINDHUDURG	Unaided - Private	N	PHARMACY	Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere	UNDER GRADUATE	PHARMACY	1st Shift	FULL TIME	0	100

Principal
Late Bhagirathi Yashwantrao Pathrikar
College of D. Pharmacy (D.Pharm & B.Pharm)

Principal
Late Bhagirathi Yashwantrao Pathrikar
College of Pharmacy, Pathri,

Late Bhagirathi Yashwantrao Pathrikar College of D.Pharmacy, (D.Phar & B.Pharm) Pathri, Tq.Phulambri, Dist.Aurangabad